**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – सतिष शंकर पठारे
वय – ३३ वर्षे,
नेमणुक – पोलीस कॉन्स्टेबल अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालय श्रीरामपुर

**<u>सरतपासणी – सहा.सरकारी अभियोक्ता श्री. आर. के. गागरे</u>**

१. दि. २९/०७/२०२३ रोजी मी अप्पर पोलीस अधिक्षक कार्यालय, श्रीरामपुर येथे नेमणुकीस होतो. सदर दिवशी कर्तव्यावर असतांना अप्पर पोलीस अधिक्षक यांना गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, वळण ता. राहुरी शिवाराती मुळा नदीपात्रात एक विनाक्रमांकाचा ट्रक्टर हा बेकायदेशीररित्या वाळुची चोरी करीत आहे त्याबाबत तुम्ही कार्यवाही करा. त्यानंतर सदर कार्यालयामध्ये उपस्थित असलेले संजय गाडेकर व मी असे आम्ही खाजगी वाहनाने राहुरी पोलीस स्टेशन येथे आलो. त्यावेळी आम्ही राहुरी पोलीस स्टेशन येथील कर्मचारी पोलीस नाईक अमित राठोड यांना माहीती सांगीतली त्यांनी पंचांना बोलावुन घेतले. पंचांना बातमीबाबत माहीती सांगीतली व त्यांनी पंच म्हणुन येण्यास सहमती दर्शविली. त्यानंतर आम्ही सर्व घटनेच्या ठिकाणी छापा टाकण्यासाठी निघालो. वळण गावाजवळ आलो असता आम्हाला पुलावरून एक सिल्वर कलरचा ट्रक्टर व ट्रॉली येतांना दिसली. सदर ट्रॅक्टर यास थांबण्याचा इशारा केला असता तो ट्रॅक्टर थांबला. त्यानंतर चालतांनी अंधाराचा फायदा घेऊन तो तेथुन निघुन गेला. ट्रॅक्टर व ट्रॉलीची तपासणी केली असता आम्हाला त्यामध्ये अंदाजे एक ब्रास वाळु आढळुन आली. त्यानंतर पोलीस नाईक राठोड यांनी दोन पंचासमक्ष ट्रक्टरचा पंचनामा केला. त्यानंतर ट्रॅक्टर व ट्रॉली आम्ही पोलीस स्टेशन येथे घेऊन आलो व मी सरकारतर्फे फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावरील सही माझी आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **<u>निशाणी क्र.१७</u>** देण्यात येते. ट्रॅक्टर चालकाचे नाव निखील रमेश खिल्लारी असल्याचे मला समजले.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे वकील श्री. जे. एम. राऊत यांच्यामार्फत–</u>**

२. दि.२९/०७/२०२३ रोजी बातमी आल्यानंतर आम्ही रात्री ९.०० च्या सुमारास निघालो. राहुरी श्रीरामपुर येथील अंतर अंदाजे ३० किमी चे आहे. आम्ही खाजगी वाहनाने राहुरी येथे आलो होतो. सदरचे वाहन हे संजय गाडेकर यांच्या मालकीचे चारचाकी होते. आम्ही राहुरी पोलीस स्टेशन येथे रात्री १०.०० वा.

आलो तेथे आम्ही १० ते १५ मिनीटे होतो. आम्ही तीन कर्मचारी व दोन पंच असे आम्ही पाच लोक वळण गावी बोलेरो गाडीने गेलो. हे म्हणणे खरे आहे की, २९/०७/२०२३ हे पावसाळयाचे दिवस होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मुळा नदीपात्रात पाणी होते. हे म्हणणे खरे आहे की, वळण गावाच्या पुलावरून पुर्व पश्चीम बाजुने मुळा नदी पात्र आहे.

३. ट्रक्टरची लांबी रूंदी व उंची आम्ही मोजली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॉली मध्ये वाळु उपसण्याचे साधन फावडे व पाटी मिळुन आली होती. वळण गावातील पुलावर पंचनाम्यासाठी आम्ही ११.०० वाजेपर्यंत होतो. वळण गावातील तलाठी यांना वाळुचोरीबाबत मी माहीती दिली नव्हती. ट्रॉली मधील वाळु ही कुठुन भरून आणली याबाबत मी शहानिशा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०७/२०२३ रोजी वळण गावातील पुलावर एक ट्रॅक्टर व ट्रॉली त्यामध्ये अंदाजे एक ब्रास वाळु मिळुन आली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील मजकुर खोटा असुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
Date: 2025.12.19 10:42:11 +0530

(**श्री. पी. एच. पाटील**)
न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग,
न्यायालय क्र.२, राहुरी

राहुरी
दिनांक – १८/१२/२०२५.